मध्यप्रदेश शासन

वि.

अहमदुल्लाह

२५ जानेवारी १९६१

मा. न्यायमूर्ती ए.के. सरकार आणि मा. न्यायमूर्ती राजगोपाला अय्यंगार

खून - आरोपी मनोरुग्ण असल्याचा बचाव- नेमकी वेळ – निर्दोष सुटका - निकालात बदल करण्यास उच्च न्यायालयाचा नकार - समर्थनीय आहे का ? भारतीय दंड विधान कलम ८४, ३०२,

आरोपी मनोरुग्ण होता या कारणाने सत्र न्यायाधीशांनी भा.द.वि.कलम ३०२ खाली खूनाचा दोषारोप असलेल्या आरोपीस निर्दोष सोडण्याचा आदेश उच्च न्यायालयाने कायम केला. सरकार पक्षाची 'केस' अशी होती की, आरोपीचा त्याच्या सासूवर आकस होता. म्हणून त्याने रात्रीच्या वेळी ती गाढ झोपेत असताना तिचा शिरच्छेद केला. त्याने गुन्हयाची कबूली दिली. मात्र, खटल्याच्या वेळी 'मनोरुग्ण' असल्याचा बचाव घेतला. विशेष अनुमतीने शासनाने केलेल्या या अपिलास असे धरण्यात आले की, प्रत्यक्ष गुन्हा घडते वेळी आरोपीच्या मनाची अवस्था काय होती? हेच तो मनोरुग्ण होता किंवा नाही? हे ठरवण्यात निर्णायक आहे. भा.द.वि.कलम ८४ च्या तरतुदीत आपण बसतो हे शाबीत करण्याची जबाबदारी आरोपीची आहे.

केवळ इतके शाबीत होणे पुरेसे नाही की, गुन्हया घडण्या आधी आणि नंतर आरोपीला फेफ-याची मनोरुग्णता होती.

हेंनरी  पेरी, १४ फौ. अपिल रि. ४८ च्या आधारे

या खटल्याच्या कामी पटलावर हे दर्शविणारे असे काहीही आले नाही की, गुन्हा घडतेवेळी आपण चुकीचे करतो आहोत किंवा, ते कायदयाच्या विरोधात आहे हे समजण्याची आरोपीची कुवत नव्हती. त्यामुळे भा.द.वि.कलम ८४ खाली निर्दोष सुटण्यास तो पात्र नाही.

या खटल्याच्या कामी शाबीत झालेल्या परिस्थीतीमुळे निर्दोष सुटकेच्या निर्णयात हस्तक्षेप करण्यास नकार देण्याच्या उच्च न्यायालयाच्या निर्णयाचे समर्थन करता येत नाही.

फौजदारी अपेलेट अधिकार क्षेत्र फौजदारी अपिल क्रं.१२०/१९६०

फौजदारी अपिल क्रं.३/१९५७ मध्ये, मध्यप्रदेश उच्च न्यायालय (ग्वाल्हेर खंडपिठ) यांनी ता. २८.०२.१९५८ ला, दिलेल्या निकाल आणि आदेशावर विशेष अनुमती घेऊन केलेले अपिल.

आय.एन. श्रॉफ अपिलार्थीतर्फे

उत्तरवादी हजर झाला नाही.

१९६१ जानेवारी २५  रोजी निकाल मा.न्यायमूर्ती अय्यंगार यांनी दिला

सदरचे अपिल, मध्यप्रदेश शासनाने खास विनंती करुन, त्यांनी आधी केलेले अपिल, मध्य प्रदेश उच्च न्यायालय (ग्वाल्हेर खंडपिठ ) यांनी फेटाळून, सत्र न्यायाधीश यांचा आरोपी भा.द.वि.कलम ३०२ खाली दंडनीय अपराधात निर्दोष असल्याचा आदेश बदलण्यास नकार दिल्याने केले आहे. सत्र न्यायाधीश आणि उच्च न्यायालय यांच्यात एकमत  असलेले आरोपीला निर्दोष धरण्याची  कारण असे आहे की, मनोरुग्ण असल्याने  गुन्हा घडते समयी

आपण काय करतो आहोत? हे समजण्याच्या परिस्थीतीत उत्तरवादी नव्हता. त्यामुळे भा.द.वि. कलम ८४ खाली तो निर्दोष सुटण्यास पात्र ठरला.

खटल्याच्या वस्तुस्थितीबाबत तसेच, संहितेच्या कलम ८४ च्या रचनेबाबत फारच थोडा वाद आहे. कारण, विद्वान सत्र न्यायाधीश आणि विद्वान उच्च न्यायालय या दोघांनीही असे धरले आहे की, घटना घडतेवेळी त्या कलमानुसार आरोपी 'मनोरुग्ण' होता हे बचाव पक्षाने शाबीत केले पाहिजे. या तत्वाचे पुराव्याने शाबीत झालेल्या बाबींची सांगड घालावयास हवी अशी अपिलार्थी सरकारची आमच्या समोर तक्रार आहे.

भा.द.वि. कलम ८४ ची तरतुद अशी आहे की, जर एखादी व्यक्ती गुन्हा करीत असताना, त्याच्या मनोरुग्णतेमुळे आपण काय करतो आहोत ?हे समजण्याच्या स्थितीत नसेल किंवा, आपण करतो आहोत ते चुकीचे आणि कायदयाविरुध्द आहे हे त्याला कळत नसेल तर, तो गुन्हा ठरत नाही.

वरील अपवादात आपण बसतो आहोत हे शाबीत करण्याची जबाबदारी आरोपीची आहे. (भारतीय पुरावा अधिनियम कलम १०५ मधील उदा. (अ) नुसार )

आमच्यासमोर उपस्थित केलेला मुद्दयांचा विचार करताना हे पहाणे गरजेचे आहे की, त्याबाबत सत्र न्यायालयाने काय निष्कर्ष नोंदवला आहे? तथापि, त्या आधी ज्याविषयी वाद नाही. ती वस्तुस्थिती कथन करणे गरजेचे आहे. उत्तरवादी आरोपी याची बायको जिनत हिला त्याने घटस्फोट दिला होता. मयत बिसमिल्लाह ही जिनतची आई होती. आरोपीच्या मनात त्याच्या सासूबद्दल आकस होता. २८ सप्टेंबर १९५४ ला, बिसमिल्लाह तिच्या घरात रात्री झोपल्यावर, दुस-या दिवशी पहाटेच्यावेळी तिच्या नव-याला तिचे प्रेत पलंगावर रक्ताच्या

थारोळयात आढळले.त्यावेळी त्या प्रेताचे मुंडके/शिर जागेवर नव्हते. बिसमिल्लाहच्या मुलाने त्वरीत वर्दीजबाब नोंदवला. पोलीसांना असे सांगण्यात आले की, आरोपीचा तिच्यावर आकस होता. त्यानंतर तपासाचे प्रमुख असलेले उप-निरीक्षक यांना उत्तरवादीकडे पाठवले. त्याने गुन्हा कबूल करुन असे सांगितले की, त्याच्या वडीलांच्या 'फर्निचर'च्या दुकानाच्या तळघरात त्याने तिचे मुंडके आणि ज्या हत्या-याने ते तोडले तो चाकू कापडी पिशवीत ठेवला आहे. मग उत्तरवादी याला त्या दुकानात नेण्यात आले आणि पंचांच्या समक्ष त्या वस्तू जप्त करण्यात आल्या. त्याने त्यावेळी दुकानाच्या 'रोकड-पेटी'त ठेवलेली एक विजेरी (टॉर्च) देखील काढून दिला. अंधारात मयत महिलेचे नेमके स्थान सापडावे याकरीता त्याने त्या 'टॉर्च'चा वापर केला होता. आरोपीने हे देखील सांगितले की, मयत महिलेच्या घराभोवतीची भिंत चढण्याकरीता त्याने शिडीचा कसा वापर केला?आणि त्याने तिच्या खोलीत प्रवेश कसा केला?. त्याला ती पलंगावर गाढ झोपलेली कशी दिसली? आणि त्याने तिचे शिर तिच्या धडापासून वेगळे कसे केले?. तसेच, त्याने हे देखील सांगितले की, कापलेले डोके त्याने तेथून कसे नेले? आणि जेथून काढून दिले तेथे कसे लपवून ठेवले? जिल्हा न्यायदंडाधिकारी यांच्यासमोर उत्तरवादीने वरीलप्रमाणे कबूल्या दिल्या. त्यानंतर, ग्वाल्हेरच्या सत्र न्यायालयात भा.द.वि.कलम ३०२ खाली त्याच्या विरुध्द खटला भरण्यात आला. त्याने दिलेल्या कबूल्यांना अन्य पुराव्याने भरीव दुजोरा मिळाला. तरी देखील त्या कबूल्या त्याने फौ.प्र.संहितेच्या कलम ३४२ नुसार त्याला विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना मागे घेतल्या नाहीत. मात्र, आपण निरागस असल्याचा आव आणला.

आरोपी मनोरुग्ण असल्याचा बचाव शाबीत करण्याकरीता, बचाव पक्षातर्फे एकूण ३ साक्षीदार तपासले. त्यापैकी, दोघे वैदयकीय क्षेत्रातील होते. पहिला साक्षीदार महावीर सिंग हा जिल्हा शल्य चिकित्सक आणि मनोरुग्णालयाचा अधिक्षक होता. त्याने असे सांगितले की,

ऑगस्ट १९५२ मध्ये त्याने आरोपीस खाजगी रुग्ण म्हणून तपासले. त्याच्या कथनानुसार, 'फेफ-याची लहर' येणे या प्रकारचा मानसिक विकार आरोपीला होता. ऑगस्ट १९५२ मध्ये म्हणजेच घटनेच्या तारखेच्या दोन वर्षांपूर्वी त्याने आरोपीला शेवटचे पाहिले होते.त्या कारणाने खून करतेवेळी आरोपीची मानसिक अवस्था काय होती ?हे समजण्यासाठी या साक्षीदाराची साक्ष निर्णायक म्हणता येणार नाही. बचाव पक्षातर्फे तपासण्यात आलेला मनोरुग्णालयाचा दुसरा अधिक्षक याने देखील आरोपीला १८.११.१९५४ म्हणजे, घटनेच्या दोन महिने आधी तपासले होते. त्याच्या कथनानुसार देखील आरोपीला फेफ-याची लहर येत होती. 'फिट'चा झटका आल्यावर,सुरवातीला 'पेशन्ट' च्या मेंदूचा पक्षघात झाल्यासारखी (spastic) अवस्था होई. दुस-या टप्प्यात तो हातपाय झाडून अनिवार हसू लागे आणि तिस-या टप्प्यात बेशुध्द पडे. शेवटच्या टप्प्यात झोपेत चालण्यासारखी कृती त्याच्याकडून घडली असती. या तज्ञाचा पुरावा आरोपीच्या आजाराच्या प्रकारावर जरी प्रकाश टाकत असला तरी, प्रत्यक्ष गुन्हा करतेवेळी त्याच्या मनाची काय अवस्था होती? याबाबत हा पुरावा नाही. त्याच्या मानसिक अवस्थेबाबत पुरावा देणारा तिसरा साक्षीदार म्हणजे त्याचे वडील आहेत. आपल्या पुराव्यात त्यांनी असे सांगितले की,

२८.०९.१९५४ च्या संध्याकाळी आरोपीच्या मनात चलबिचल चालू होती. दोन दिवस तो जेवला नव्हता. २९ सप्टेंबरच्या सकाळी साडेसात किंवा पावणे आठला मी माझ्या दुकानात गेलो तेव्हा तेथे तो मला बेशुध्द अवस्थेत दिसला. त्याचे हात आणि पावले कठीण झालेली आढळली. लगेचच पोलीस तेथे आले आणि त्याला घेऊन गेले.

वरील पुराव्याच्या आधारे विद्वान सत्र न्यायाधीश यांनी अगदी योग्य म्हटले आहे की,भा.द.वि.कलम ८४ चा तरतुदीनुसार गुन्हा घडतेवेळी आरोपीची मनोरुग्ण अवस्था असणे

शाबीत व्हावयास हवे आणि आपण अपवादात बसतो हे शाबीत करण्याची जबाबदारी त्याचीच आहे. या संदर्भात खटल्यातील पुराव्याचा सारांश असा आहे की,

विचार करण्याकरीता पुढील बाब अशी आहे की, आपण करीत असलेल्या कृत्याचे स्वरुप समजण्याच्या स्थितीत आरोपी होता का? तो आपल्या सासूच्या घरी रात्रीच्या वेळी गेला. त्याने जाणीवपूर्वक तिचे शिर तोडले आणि ते घेऊन तो आपल्या घरी आला. यातून हे स्पष्ट होते की, आपण काय करतो आहोत? ते त्याला समजत होते. वेगळया प्रकारे सांगायचे तर, बिसमिल्लाह हिला मारताना तो या समजूतीखाली नव्हता की, आपण मातीचा घडा फोडतो आहोत. अगदी बचाव पक्षाच्या वकीलांनी देखील इतक्या पराकोटीच्या मानसिक अवस्थेवर भर दिलेला नाही. तथापि, त्यांचे इतकेच म्हणणे होते की, आपण जे करतो आहोत, ते चुकीचे आणि कायदया विरुध्द आहे हे समजण्याच्या स्थितीत तो त्यावेळी नव्हता.

तथापि, विद्वान न्यायाधिशांनी आरोपीला निर्दोष सोडताना खालील कारण दिले आहे

गुन्हा घडल्यानंतर लगेचच आरोपीला मनोरुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथील अधिक्षकांनी किमान इतके तरी सांगितले आहे की, त्यास फेफ-याचे झटके येत असत. हा विकार असा आहे की, त्याने मनुष्य मनोरुग्ण होऊ शकतो. त्या आजारास 'फेफ-याची-मनोरुग्णता' म्हणतात. अश्या अवस्थेत, रुग्ण निघृण खून करु शकतो. तसे करताना, आपण काय करतो आहोत? हे त्याला समजत नसते. त्यामुळे यावर विश्वास ठेवण्यास कारण आहे की, फेफ-याच्या लहरीत त्याच्याकडून खून झाला. .......... याबाबींवरुन असा निष्कर्ष काढता येतो की, फेफ-याच्या लहरीत त्याने गुन्हा केला. आपण जे करतो आहोत? ते चुकीचे आणि कायदया विरुध्द आहे हे तेव्हा त्यास समजत नव्हते. म्हणून

मी असा निष्कर्ष नोंदवतो की, आरोपी अहमदुल्लाह याने बिसमिल्लाह हिचे शिर, तिच्या धडापासून चाकूने वेगळे करुन, तिला ठार मारले असले तरी, तसे करते वेळी आपण चुकीचे अथवा कायदयाविरुध्द करतो आहोत हे त्याला कळत नव्हते. म्हणून भा.द.वि.कलम ३०२ खाली खुन्याच्या गुन्हयात त्याला दोषी धरता येणार नाही. सबब, त्यास निर्दोष सोडण्याचे मी निर्देश देतो आहे.

विद्वान न्यायाधीश यांना निश्चितपणे असे आढळले की, आपण करत असलेल्या कृत्याचे स्वरुप आरोपीला समजत होते. आम्ही सध्या जो निष्कर्ष काढत आहोत तो उच्च न्यायालयाने देखील काढलेला आहे. शेवटचा निष्कर्ष ज्या आधारे काढण्यात आला आहे ते कारण पटण्यास कठीण आहे.

सत्र न्यायालयाच्या निर्दोष सोडण्याच्या आदेशाविरुध्द राज्य शासनाने उच्च न्यायालयात अपिल केले. उच्च न्यायालयाने देखील भा.द.वि.कलम ८४ चा यथायोग्य परामर्श घेतला. त्यांनी असे नमुद केले की,

घटनेच्या अगदी आगोदरची आणि लगेच नंतरची मानसिक अवस्था निर्णायक ठरते. २९ तारखेच्या पहाटेचे उत्तरवादीचे वर्तन आणि दुपारी त्याने दिलेली कबूली याबाबी कलम ८४ ची तरतुद लागू होण्यात इतका तो मनोरुग्ण होता याला आधार देत नाहीत. खून हा असाधारण धुर्तपणे आणि तपशिलवार अवधानाने ......... हे निश्चित की, आपण काय करतो आहोत? त्या कृत्याचे स्वरुप आरोपीला समजत होते. तो या समजूतीत नक्कीच नव्हता की, आपण घडा फोडतो आहोत किंवा, कोबी कापतो आहोत. त्याच्या १६ तासातील सांगण्यानुसार, त्याने मानवी जीवन संपुष्टात आणले. आपल्या आत्म-सन्मानासाठी आपण

तसे केले असे या कृत्याचे त्याने समर्थन केले. वस्तूत कबूली देत असताना, त्याची अवस्था खिन्नतेची किंवा काहीही न आठवण्याची नसून, ती घमेंड दाखवण्याची आणि फुशारकीने मोठा आनंद व्यक्त करण्याची होती. ..............विद्वान सत्र न्यायाधीशांनी असे धरले की, २८ तारखेच्या रात्री उत्तरवादी हा फेफ-याच्या मनोरुग्णतेने ग्रस्त होता. सासूला मारल्यानंतर किमान त्याची कबूली नोंदवेपर्यंत तो त्याच अवस्थेत होता. हा निष्कर्ष त्या निष्कर्षास कसल्याही पुराव्याचा आधाराविना आहे असे म्हणता येणार नाही. ता.२९ सप्टेंबर १९५४ या दिवशीच्या लगेचच नंतर उत्तरवादीविषयी जी निरीक्षणे नोंदवण्यात आली आहेत त्याच्याशी सुसंगत असेल तरच, त्यास चुकीचे मानता येणार नाही.

आपल्या पुढील विवेचनात उच्च न्यायालयाने याकडे लक्ष वेधले की, वैदयकीय तज्ञांनी घटनेनंतर लगेचच असे निरीक्षण नोंदवले नाही की, ज्याआधारे घटनेच्या अगदी आधी आरोपीची मानसिक अवस्था काय होती ते कळावे. उभय पक्षांचा तपशिलवार युक्तीवाद ऐकून विद्वान न्यायमूर्तींनी असा निष्कर्ष काढला की,

भा.द.वि.कलम ८४ साठी आवश्यक, गुन्हा करते वेळची मनोरुग्णतेचे प्रमाण (डिग्री) दर्शविणारा पुरावा आमच्यासमोर नाही. तथापि, आमच्या समोर सादर केलेले त्रुटीयुक्त पुरावा विचारात घेता, आमच्या मते कोणत्याही प्रकारचा असमाधानकारक निष्कर्ष ...........या प्रकारच्या खटल्यात, जेव्हा शाबीत झालेल्या बाबी खूनाबाबत शिक्षा ठोठावण्यास आधार देतात तेव्हा, बचाव पक्षावर पुरावा देण्याची जबाबदारी पडते. त्यांनी तसे न करण्याने त्याचे फळ/परिणाम त्यांना भोगावा लागेल.

विद्वान उच्च न्यायालयाच्या वरील निरीक्षणांवरुन असे दिसते की, या खटल्याचे कामी कलम ८४ ची तरतूद लागू होते का? याबद्दल विद्वान उच्च न्यायालय सत्र न्यायाधिशांपेक्षा वेगळया मताचे होते. तथापि, निकालपत्रात त्यांनी असे दिले आहे की,

सत्र न्यायाधिशांचे याबाबत समाधान झाले आहे की, गुन्हा करतेवेळी आरोपीला आपण चुकीचे आणि कायदया विरुध्द करत आहोत हे न कळण्याइतपत तो मनोरुग्ण होता हे बचाव पक्ष शाबीत करु शकला आहे.सदरचा निर्णय चुकीचा असून, झालेला निकाल बदलण्यास भाग पाडणारी कारणे आहेत हे दाखवून देण्याची आता ही शासनाची जबाबदारी आहे.

या कारणाने विद्वान न्यायमूर्तीनी शासनाचे अपिल फेटाळले.

या निष्कर्षाशी आणि त्याला दिलेल्या कारणांची आम्ही सहमत होऊ शकत नाही. आरोपीच्या वडीलांचा पुरावा स्विकारण्याचा सत्र न्यायधिशांचा निर्णय चुकीचा आहे. हे न्यायमूर्तीनी लक्षात घेतले नाही. कारण आरोपीचे वडील हे हितसंबंधी साक्षीदार होते. त्याबाबत अपिलार्थी शासनाने तक्रार करणे अगदी रास्त होते. आरोपीला निर्दोष सोडण्याच्या निर्णयात हस्तक्षेप करणे क्वचितच समर्थनीय ठरते. पटलावर असे काहीही नाही की, गुन्हा करतेवेळी आपण चुकीचे किंवा कायदयाशी विसंगत करत आहोत हे समजण्याची आरोपीची कुवत नव्हती. त्यामुळे उच्च न्यायालयाच्या निर्णयात त्रुटी आढळते.

इंग्लंडमध्ये हेनरी पेरी च्या खटल्यातील फौजदारी अपिलात देखील आरोपीचा बचाव 'फेफ-याची-मनोरुग्णता' असाच होता.तेव्हा सर-न्यायाधिशांनी असे धरण्यात आले की,

या कामी महत्वाचा मुद्दा हाच आहे की, गुन्हा घडतेवेळी आरोपीस

'फिट' चा त्रास होत होता किंवा नाही ?अन्यथा, हे तत्व अत्यंत धोकादायक होईल की, कोणे एकेकाळी एखादयाला 'फिट' येत होत्या म्हणून त्यानंतर त्याच्याकडून घडलेले प्रत्येक कृत्य माफ होईल.

सदरचे अपिल फेटाळताना विद्वान सर न्यायाधिशांनी असे धरले की, प्रत्येक मनुष्य हा इतपत सुज्ञ असतो की, त्याच्या कृत्याची जबाबदारी त्याला कळते. तो मनोरुग्ण होता हे शाबीत करताना, असे शाबीत होणे गरजेचे आहे की, त्या मनोरुग्णतेमुळे आपण काय करतो आहोत? हे त्याला समजत नव्हते. याकामी वैदयकीय स्वरुपाचा पुरावा 'ज्यूरी' समोर आला असून, खुद्द कैदयाने आपणास फेफ-याच्या 'फिट' येत असल्याचे सांगितले. शिवाय, तुरुंगाच्या दप्तरी त्याला फेफ-याचे झटके येतात अश्या नोंदी आहेत. तथापि, या सगळयातून खून करतेवेळी तो त्या अवस्थेत होता हे शाबीत झाले नाही.

या खटल्यातील परिस्थीती अगदी तशीच आहे. वरील निवाडयातील निरीक्षण येथेही समर्पक आहे. आम्हास असे वाटते की, सत्र न्यायधिशांसमोर या निष्कर्षास पोहोचण्यास कोणताही पुरावा नव्हता की, आपल्या सासूचा गळा कापून, तिचे मस्तक धडावेगळे करण्याच्या नेमक्या घटनेच्यावेळी मनोरुग्णतेमुळे आपण चुकीचे करतो आहोत. हे आरोपीला समजत नव्हते. त्याच्या वडीलांचा पुरावा देखील या निष्कर्षाला आधार देत नाही. याकामी खालच्या कोर्टाने हे लक्षात घेतले नाही की, खून कोणत्या परिस्थीतीत झाला. बिसमिल्लाह विरुध्द आरोपीच्या मनात आकस होता. तिला मारण्याकरीता त्याने काळोखाची रात्रीची वेळ निवडली. जेणेकरुन तो कोणाला दिसू नये. हातात 'टॉर्च' घेऊन तो शिडीने भिंत

चढून न कळत तिच्या घरात शिरला. मग त्याने अत्यंत परमानंदाच्या विकृत मनस्थितीत मयत महिलेला ठार मारले. सदरचा गुन्हा हा अचानक वेडयाच्या भरात झालेला नसून, काळजीपूर्वक योजना आखून ती योजना शांत चित्ताने अंमलात आणली गेली. तिचा रोख जीला आपण शत्रू समजतो तिच्यावर होता.

म्हणून हे अपिल मंजूर केले आहे. उत्तरवादीस निर्दोष सोडण्याचा आदेश रद्द केला आहे. त्याऐवजी, त्याला भा.द.वि. कलम ३०२ खाली खूनाच्या गुन्हयात दोषी धरले आहे. सर्वसाधारणपणे अश्या निघृण आणि पूर्वनियोजित अमानुष गुन्हयास देहदंड दयायला हवा. तथापि, याकामी सत्र न्यायधिशांनी आरोपीला निर्दोष सोडण्याचा निर्णय उच्च न्यायालयाने कायम केलेला असल्याने आम्हास असे वाटते की, सक्त मजूरीच्या जन्मठेपाची शिक्षा ठोठावणे न्यायोचित होईल. आरोपीचा आजार जर अजूनही चालू असेल तर, तो बरा होईपर्यंत राज्य शासनाने त्यास रुग्णालयात ठेवावे.

अपिल मंजूर.

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल

आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला

जाईल.